# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र.१४/२०२२** **दिनांक २२.११.२०२२**
**स्थळ- साईनिवास अतिथीगृह, शिर्डी** **वेळ- सकाळी १०.०० वाजता**

मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथील जनहित याचिका नं.९८/२०२१ व १००/२०२१ (सिव्हील ॲप्लीकेशन नं.११९७३/२०२१) यावर दि.१३/०९/२०२२ रोजी मा.न्यायालयाने दिलेल्या आदेशान्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी करीता नियुक्त केलेल्या तदर्थ (Ad-hoc) समितीची सभा सोमवार दि.२१/११/२०२२ रोजी दुपारी ०३.०० वा. तदर्थ (Ad-hoc) समितीची सभा आली होती. सदरहु सभेतील जे विषय वेळेअभावी प्रलंबीत ठेवण्यात आले त्या विषयावर चर्चा करणेसाठी तदर्थ (Ad-hoc) समितीची सभा मंगळवार दि.२२.११.२०२२ रोजी सकाळी १०.०० वा. संस्थानचे साई निवास अतिथीगृह येथे त्याच अजेंडयानुसार सुरु ठेवण्यात यावी असे ठरले होते.

त्यानुसार तदर्थ (Ad-hoc) समितीची सभा मंगळवार दि.२२/११/२०२२ रोजी सकाळी १०.०० वा. साई निवास अतिथीगृह येथे मा.श्री.सुधाकर यार्लगड्डा, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर तथा अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती यांचे अध्यक्षतेखाली त्याच अजेंडयावरील उर्वरीत विषयांवर चर्चा करणेसाठी सुरु करण्यात आली.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे वतीने उप मुख्य कार्यकारी अधिकारी सभेकरीता उपस्थित होते.

**या सभेस खालील मा. सदस्य उपस्थित होते.**

- **मा.श्री. सुधाकर यार्लगड्डा,**
  **प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर तथा**
  **अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**

- **मा.डॉ. राजेंद्र भोसले, भा.प्र.से.**
  **जिल्हाधिकारी अहमदनगर तथा**
  **सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**

- **मा.श्री. राहूल जाधव,**
  **उप मुख्य कार्यकारी अधिकारी,**
  **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**

---

**विषय नं.४** दि.२६.०८.२०२२ रोजी शिर्डी येथे झालेल्या मा.व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

**निर्णय क्र.६०३** स्थगीत

---

**विषय नं.५** दसरा उत्सव २०२२ साजरा करणेस व याकामी येणारे खर्चाचे अंदाजपत्रकास मान्यता या विषयाची माहिती याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे पत्र जा.नं.एसएसएस/मुकाअ/२९८२/२०२२, दि.०१/११/२०२२ अन्वये केलेला खुलासा, दसरा उत्सव-२०२२ साजरा करणेस व त्याकामी येणारे खर्चाचे अंदाजपत्रकास मान्यता या विषयासह समितीचे विचारार्थ ठेवणे.

**निर्णय क्र.६०४** स्थगीत.

---

**विषय नं.६** श्री साईनाथ रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी आर.एम.ओ. म्हणून नेमलेले व कंन्सल्टंट डॉक्टरांचे काम करत असलेले वैद्यकीय अधिकारी यांचे बाबत.

**निर्णय क्र.६०५** या विषयाचा अहवाल सादर केला आहे . याबाबत डीन, बी.जे. मेडीकल कॉलेज, पुणे यांचे नावाखाली पात्रता दाखविली आहे. विहित पात्रतेच्या बाबतीत यशोधरा, सोलापुर या संस्थेकडून मार्गदर्शन घेतले. MOU वर काही संस्था हॉस्पिटल चालवितात. आपले दोन्ही हॉस्पिटलची माहिती देऊन त्यांचेकडून अभिव्यक्ती स्वारस्य त्वरीत बोलावून घेण्यात यावे. नियमानुसार विहित पात्रतेत बसते किंवा नाही याबाबत वैद्यकीय शिक्षण विभाग यांचेकडून फेर तपासणी करावी. त्यांची मुळ नियुक्ती आरएमओ म्हणून केलेली होती. परंतु त्यांना कंन्सलटंट म्हणून प्रोत्साहन भत्ता सध्या देत आहेत. परंतु त्यांची मुळ नियुक्ती आरएमओ म्हणून असल्यामुळे त्यांनी आरएमओ म्हणून पुर्ण वेळ काम करावे. कंन्सलटंट म्हणून त्यांना दिल्या जात असलेल्या भत्त्याबाबत समिती सध्या अभिप्राय व्यक्त करत नाही.

---

**विषय नं.७** वाहन विभागातील वापरास योग्य असलेल्या परंतु वापरात नसलेल्या १५ बसेस बाबत दि.०२/११/२०२२ चे सभेतील निर्णय क्र.५९३ नुसार माहिती.

**निर्णय क्र.६०६** मागील सभेमध्ये या बाबत चर्चा झाली असून समितीने सदरची बस सेवा नगरसुल ते शिर्डी अशी एसटी महामंडळाने सुरु केल्याचे संबधीत विभाग प्रमुख श्री.अमृत जगताप यांनी सांगीतले.

प्रवासी वाहतुकीची जबाबदारी ही संस्थानचे मुख्य कर्तव्य नाही. वापरास योग्य असलेल्या परंतु वापरात नसलेल्या ज्या बसेस आहेत त्या बसेस संस्थानचे मालमत्तेचा विनियोग करणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. त्यामुळे सदरच्या बसेस विनावापर असल्यास त्यामध्ये घसारा होत आहे व त्यामुळे संस्थानला तोटा संभवत आहे. आणखी काही कालावधी गेल्यास जी रक्कम गुंतवणूक केलली आहे. त्याचे वापराकरीता गुंतवणूकीप्रमाणे त्याचा वापर न झाल्यास तोटा होईल तरी प्रशासनाने याबाबत ठोस प्रस्ताव सादर करावा. समितीच्या या मताशी प्रशासन सहमत नसेल तर स्पष्टीकरणात्मक प्रस्ताव सादर करावा.

---

**विषय नं.८** संस्थानच्या मालमत्ता व दायित्व, सध्या चालू असलेल्या भरती प्रक्रिया, खरेदी प्रक्रिया, संस्थानकडून देणे थकबाकी इत्यादीबाबत दि.०२/११/२०२२ चे सभेतील निर्णय क्र.५९५ नुसार माहिती.

**निर्णय क्र.६०७** मा.उच्च न्यायालयाचे आदेशानुसार समितीची, पर्यवेक्षण, देखरेख करणे व कारभार पाहणे ही कर्तव्य आहेत. परंतु प्रशासनाने याबाबत माहिती दिलेली नाही. त्यामुळे समितीस संस्थान व्यवस्थापनाचे कामकाज करतांना अडचणी येत आहेत.

---

**विषय नं.९** पुजारी, उप पुजारी, विनावादक, तबला वादक इत्यादि भरती प्रक्रियेबाबत दि.०२/११/२०२२ चे सभेतील निर्णय क्र.५९५ नुसार माहिती.

**निर्णय क्र.६०८** प्रस्ताव सादर केलेला नाही.

---

**विषय नं.१०** संस्थानचे दोन्ही हॉस्पीटलसाठी लागणारे औषधे, शिल्लक साठा, आवश्यक खरेदी व खरेदीच्या प्रक्रियेची सद्यस्थिती याबाबत औषध खरेदी निविदेचा मसुदा दि.०२/११/२०२२ चे सभेतील निर्णय क्र.५९६ नुसार मान्यतेबाबत.

**निर्णय क्र.६०९** दि.१४.०९.२०२२ रोजी अध्यक्ष यांनी पदभार घेतल्यानंतर प्रशासनाचे वतीने चालू प्रक्रिया, खरेदी प्रक्रिया, भरती प्रक्रिया वगैरे सर्व प्रक्रियांची आजपर्यंत माहिती दिलेली नाही. वरील ठरावानुसार निर्णय दिल्यानंतरही पुर्तता केली नाही. म्हणून संबधीत विभागप्रमुखांना बोलावून माहिती घेण्याचे ठरविले.

या विषयाचे संदर्भात पहिली ई-निविदा दि. ०२.०८.२०२२ रोजी काढण्यात आली. त्यामध्ये गोळया, सीरप, ड्रॉप, इंजेक्शन वैगरे पाच गोष्टींचा समावेश होता. त्यापैकी ९० टक्के वस्तु पुरविण्याची अट प्रथम निविदेत होती. दुस-या निविदेत ती

बदलण्यात आली. निविदेमध्ये वार्षिक उलाढाल किती असावी या अटीचा समावेश होता.

उदा:

| अ.नं. | टेंडरचा दिनांक | टेंडर संख्या | रि-टेंडर दिनांक | खरेदी औषधाचे नाव | अंदाजे खर्च | वार्षिक उलाढालीची अट | पुरवठयाची अट प्रथम टेंडर प्रमाणे | पुरवठयाची अट दुस-या टेंडर प्रमाणे. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २.८.२०२२ | ३ | ६.९.२०२२ | गोळया- ३१७ प्रकार | ३.५ कोटी | ५० कोटी | ९० टक्के गोळया | ७० किंवा ५० टक्के |
| २ | २.८.२०२२ | ६ | ६.९.२०२२ | इंजेक्शन- २२० प्रकार | ८.९१ कोटी | ५० कोटी | ९० टक्के इंजेक्शन | ७० किंवा ५० टक्के |
| ३ | २.८.२०२२ | ४ | ६.९.२०२२ | सीरप | ९७ लाख | ५० कोटी | ९० टक्के सीरप | ७० किंवा ५० टक्के |

सर्जिकल साहित्यासाठी २० वर्षाचे अनुभवाची अट, कॅथलॅबसाठी व लॅबरोटरी केमीकलसाठी ५ वर्षाचा अनुभव अशी अट टाकण्यात आली. सर्व निविदा व अटी पाहिल्यानंतर असे लक्षात आले की, निविदा भरणा-याने प्रत्येक प्रकारामध्ये ९० किंवा ७० टक्के कमीत कमी पुरवठा करण्याची तयारी दर्शविली पाहिजे, या अटीमुळे काही ठरावीकच व्यक्ती निविदा भरु शकतात. एकुण निविदा किंमत विचारात घेता वार्षिक उलाढालाची अट Procurement Manual मधील नियमाला धरुन नाही. त्यामुळे देखील काही पुरवठादार निश्चीत स्पर्धेत भाग घेऊ शकले नाही. पेमेट संस्थान किती दिवसात करणार याचा उल्लेख नाही. वरील अटी व शर्ती यांचे अवलोकन केल्यानंतर निविदा नियमाप्रमाणे नाहीत. पारदर्शक नाहीत. स्पर्धेमध्ये मुख्य उत्पादक यांना भाग घेण्याजोगे नाही. त्यामुळे खरेदी प्रक्रिया पुन्हा अटी व शर्ती तज्ञांकडून मार्गदर्शन घेऊन पाच दिवसात री-टेंडरचा प्रस्ताव मा.अध्यक्ष यांचेकडे पाठवावा.

---

**विषय नं.११** संस्थान कर्मचा-यांना गणवेष–पूर्वीची व नंतरची निविदा व निर्णयाबाबत दि.०२/११/२०२२ चे सभेतील निर्णय क्र.५९७ नुसार माहिती.

**निर्णय क्र.६१०** विषय सादर केलेला नाही. गणवेष देणेबाबत पुर्वीचा ठराव दाखविलेला नाही. गणवेष देणेऐवजी रोख भत्ता देणेचा निर्णय झालेला असतांना गणवेष पुरविण्यासाठीचा कार्यादेश समितीच्या कोणत्या आदेशानुसार देण्यात आला याचा खुलासा तीन दिवसात अध्यक्ष यांचेकडे सादर करावा.

---

**विषय नं.१२** रविवार, गुरुवार व इतर दिवशी राखीव ठेवलेल्या शॉल्सबाबत दि.०२/११/२०२२ चे सभेतील निर्णय क्र.५९८ नुसार माहिती.

**निर्णय क्र.६११** पदभार घेतल्यापासून म्हणजेच दि.१४.९.२०२२ पासून राखीव स्लॉटमध्ये समिती सदस्यांपैकी कोणाच्या शॉल टाकण्यात आल्या आणि राखीव स्लॉट पैकी समिती सदस्या व्यतिरीक्त कोणाच्या शॉल टाकण्यात आल्या याची माहिती बोलविण्यात यावी. राखीव दिवसाव्यतिरिक्त इतर दिवशी लॉटरी सिस्टीम प्रमाणे शॉल न टाकता दुस-यांच्या शॉल टाकल्या त्यांची यादी देण्यात यावी. पाच दिवसात अध्यक्ष यांचेकडे माहिती पाठविण्यात यावी.

---

**विषय नं.१३** श्री साईबाबा महाविद्यालय–सहाय्यक प्राध्यापक (Ad-hoc) भरती करिता जाहिरात बाबत.

**निर्णय क्र.६१२** जाहिरातीचा मसुदा मंजूर. अध्यक्ष यांचेकडून मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे नाव मनोन्वित करण्यात येत आहे. मुलाखतीसाठी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिनांक निश्चीत करावी.

---

**विषय नं.१४** संस्थानचे कायम व कंत्राटी कर्मचा-यांसाठी कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करणेबाबत. कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालय, नवी दिल्ली यांचेकडील सर्वकष प्रस्तावाबाबत.

**निर्णय क्र.६१३** विषय तातडीचा नाही. तहकुब.

---

**विषय नं.१५** मौजे शिर्डी ता.राहाता येथील सि.स.नं ९३ क्षेत्र ९३.७ चौ.मी.या श्री व्दारकामाई मंदिराचे दक्षिण बाजूकडील मिळकत व मोकळी जागा श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे नावे होणेबाबत प्रस्ताव, प्लॅन व संबंधीत दस्तऐवज, त्याकामी इच्छूक देणगीदार या सर्व माहितीसह विचार करणे.

**निर्णय क्र.६१४** माहिती दिलेली आहे अवलोकन केले.

---

**विषय नं.१६** आयकर विभागाच्या रु.४९८ कोटी कर भरणा नोटीसा तसेच आयकर विषयक कामकाजाची सद्यस्थिती बाबत मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचा निर्णय क्र.५२७ च्या कार्यवाहीचे अवलोकन होणेबाबत.

**निर्णय क्र.६१५** अभिप्राय पाठविणे बाबतचे पत्राचे अवलोकन केले. महाधिवक्ता यांचा अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर समितीसमोर ठेवण्यात यावा.

---

**विषय नं.१७** सन २०२३-२४ या वर्षाकरिता एल.आय.सी.ग्रुप ग्रॅज्युईटी इन्शुरन्स स्कीम सह इतर शासकीय स्कीम याबाबत समितीस अवगत करणे.

**निर्णय क्र.६१६** इतर स्किमची माहिती दिली नाही.

---

**विषय नं.१८** संस्थानला देणगी स्वरुपात प्राप्त होणारे सोने चांदी वस्तुंची कस लावून तपासणी करुन बाजारभावाप्रमाणे किंमत निश्चित करणेकामी, सोने-चांदी मुल्यांकनकार यांना मासिक मानधनावर दोन वर्षाकरीता मुदतवाढ देणेबाबत.

**निर्णय क्र.६१७** सध्याचे जे मुल्यांकनकार आहेत त्यांना प्रतिमहा एकत्रित मासिक रक्कम रु.७०००/- मानधनावर पुढील एक वर्ष कालावधीसाठी मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली. कारण ते स्थानिक असून ते वेळेवर उपलब्ध होतात व त्यांचे मानधन हे माफक स्वरुपाचे आहे.

---

**विषय नं.१९** संस्थानचे दोन्ही रुग्णालयांकरीता कार्यान्वीत करावयाच्या संगणकीय प्रणालीच्या उपयुक्ततेबाबतचा पाहणी अहवाल.

**निर्णय क्र.६१८** प्रस्तावाचे अवलोकन केले. वेळे अभावी तहकुब.

---

**विषय नं.२०** GEM Portal नोंदणीकरणाबाबतची सद्यस्थिती.

**निर्णय क्र.६१९** पुर्तता केलेली नाही. तीन दिवसात पुर्तता करुन अहवाल सादर करावा.

---

**विषय नं.२१** बांधकाम प्रकल्पाकरीता आर्किटेक्ट पॅनलवर आर्किटेक्ट निवडीसाठी expression of interest from donors माहिती.

**निर्णय क्र.६२०** तहकुब.

---

**विषय नं.२२** सन २०२२-२३ या आर्थिक वर्षामधील संस्थानकडील दैनंदिन वापराने खराब झालेल्या रिकामे तेलातुपाचे लहान / मोठे तोंडाचे खराब व चांगले डबे विक्री करणेकामी फेर ई-निविदा मागविणेबाबत.

**निर्णय क्र. ६२१ प्रस्ताव सादर केलेला नाही.**

---

**विषय नं.२३ संस्थानची नावे, बोधचिन्हे, अधिकृत वेबसाईट, प्रकाशने इ.चे Trademark व Copy Right बाबतची कार्यवाही करणेकामी या क्षेत्रातील तांत्रिक सल्लागाराची नेमणूक करणेबाबत.**

**निर्णय क्र.६२२ प्रस्ताव सादर केलेला नाही.**

---

**विषय नं.२४ संस्थान नियुक्त तांत्रिक सल्लागार M/s DSG Consultant Pvt. Ltd. Mumbai यांचे प्राप्त अभिप्रायानुसार नविन दुरध्वनी यंत्रणेचे Service/Support बाबत तांत्रिक सल्लागार व पुरवठाधारक यांचेशी समक्ष चर्चा होऊन लेखापरिक्षणाच्या दृष्टीने प्रस्तावातील मुद्दा क्र."A" ते "G" प्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.६२३ Manual for Procurement for Consultancy and other Services-2017 नुसार कार्यवाही करावी. तसेच याकामी कॉल बेसीसवर सेवा घेण्यात यावी. याकामी संस्थानकडे उपलब्ध असणा-या कर्मचा-यांना प्रशिक्षण देण्यात यावे.**

---

**विषय नं.२५ ध्वनिक्षेपन यंत्रणा अद्यावतीकरणाचे निविदेसंबधीत कार्यवाही महाराष्ट्र शासनाचे Maha IT विभाग, मुंबई यांचेमार्फत करणेऐवजी संस्थानमार्फत सदरकामी तज्ञ सल्लागाराची नेमणूक ई-निविदा पध्दतीने करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.६२४ सदरचे काम करुन घेणेसाठी अभिव्यक्ती स्वारस्य या पध्दतीचा वापर करावा.या कामी कला निर्देशक श्री.नितीन चंद्रकांत देसाई , श्री.नितीन कुलकर्णी व इतरांकडून अभिव्यक्ती स्वारस्य मागविण्यात यावे.**

---

**विषय नं.२६ श्री साईनाथ रुग्णालयात वाढीव खाटांसाठी व MJPJAY कार्यान्वीत करणेसाठी कर्मचारी उपलब्धता व त्यासाठीचे अंदाजे खर्चाबाबत दि.०२/११/२०२२ चे सभेतील निर्णयानुसार सविस्तर खुलाशासह प्रस्ताव.**

**निर्णय क्र.६२५ प्रस्ताव सादर केला नाही.**

---

**विषय नं.२७ दिनांक ०७ ऑगस्ट, २००९ चे आकृतीबंधासोबतच्या मंजूर परिशिष्ट "अ" मध्ये नमूद असलेल्या वेतनश्रेणीनुसार संस्थान आस्थापनेवर ११ महिन्यांकरीता कंत्राटी पध्दतीने घेणेत आलेले कंत्राटी कर्मचारी यांचा वेतन मिळणेबाबतचा अर्ज निर्णयास्तव.**

**निर्णय क्र.६२६ प्रस्ताव सादर केला नाही.**

---

**विषय नं.२८ श्री साईबाबांचे पादुका दर्शन सोहळयाचे आयोजनाकामी नियमावली व समिती गठीत करणेबाबत.**

**निर्णय क्र.६२७ प्रस्ताव सादर केला नाही.**

---

**विषय नं.२९ औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील रिक्त पदावर Ad-hoc पध्दतीने निदेशक नेमणूक करणेबाबत.**

**निर्णय क्र.६२८ प्रस्ताव मंजुर.**

---

**विषय नं.३० शैक्षणिक वर्ष २०२२-२३ इयत्ता १ ली च्या वर्गासाठी शासनाचे बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम-२००९(RTE Act-2009) अन्वये इयत्ता १ ली चे एकुण १७६ नवीन प्रवेशानुसार २५% प्रमाणे ५९ विद्यार्थ्यांना मोफत प्रवेश देणेकामी मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.६२९ विभाग प्रमुख यांनी सविस्तर माहिती दिली नाही. पुढील सभेत अभ्यास करुन यावे. तहकुब.**

---

**विषय नं.३१ साईभक्तांना देण्यात येणा-या कॉट/लॉकर्स व अनुषंगीक सेवा पुरविण्याचे सेवा आकारामध्ये वाढ करणेबाबत.**

**निर्णय क्र.६३० डिसेंबर-२०२३ पर्यंत सेवा आकारात वाढ करु नये असा निर्णय घेण्यात आला.**

---

**विषय नं.३२ संस्थान मालकीचे विविध ठिकाणचे जागा/गाळे शासकीय कार्यालय/खाजगी व्यक्ती/ सोसायटी यांना भाडेतत्वावर दिलेल्या मिळकतींचे शासनाचे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून भाडे निश्चित करणेबाबत प्रथम सर्व करारनामे नोटराईज करुन घेणेकामीचा निर्णय होणेबाबत.**

**निर्णय क्र.६३१** **महाराष्ट्र म.न.पा. स्थावर मालमत्ता भाडेपट्टा नुतनीकरण हस्तांतरण नियम २०१९ चे कलम ७९ (क) प्रमाणे जाहीर लिलाव पध्दतीचा अवलंब करणे आवश्यक आहे. मालमत्ता मुल्यांकन (मालमत्तेचे वास्तव मुल्य निर्धारीत करणे) १९९५ प्रमाणे मुल्यांकनाचा अभ्यास करावा. भाडेपट्टयाची मुदत संपली असेल तर बाजारभावाच्या ८ टक्के अधिक भाडेदराच्या रकमेवर २ टक्के व्याज आकारणे याबाबत अभ्यास करावा. भाडेपट्टयाचा कालावधी यावर अभ्यास करावा. प्रिमियम किती घ्यावा याबाबत अभ्यास करावा. नुतनीकरण करावयाचा असल्यास अटी व शर्तीचा उल्लेख करावा. प्रथम लिलाव पध्दतीने भाडेपट्टा करण्याचा प्रयत्न असावा या सर्व गोष्टींचा विचार करुन अभ्यासपुर्वक सविस्तर प्रस्ताव समितीपुढे ठेवण्यात यावा.**

---

**विषय नं.३३** **श्री. शरद कचरु गोडगे, मदतनीस, बांधकाम विभाग यांचे गैरशिस्तवर्तनाबाबत.**

**निर्णय क्र.६३२** **स्थगीत.**

---

**विषय नं.३४** **श्री. शेखर विजय कुलकर्णी, सेवा निलंबीत सीसीटीव्ही ऑपरेटर, सीसीटीव्ही कंन्ट्रोल सेल यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत.**

**निर्णय क्र.६३३** **प्रस्ताव सादर केलेला नाही.**

---

**विषय नं.३५** **सर्व न्यायालयामध्ये संस्थानचे वतीने बाजू मांडणेकरीता वरिष्ठ वकिलांचे पॅनल तयार करणेसाठी पात्र अर्जदारांच्या मुलाखती घेणेबाबत.**

**निर्णय क्र.६३४** **प्रस्ताव सादर केलेला नाही.**

---

**विषय नं.३६** **श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये जुलै-२०२२ महिन्यात वैद्यकिय बिलात देण्यात आलेली सवलत रक्कम रु.६२,३२,३५५/-ची नोंद घेऊन खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.६३५** **तहकुब.**

---

**विषय नं.३७** **श्री साईनाथ रुग्णालयात माहे जुलै-२०२२ अखेर वैद्यकीय उपचार व औषधांसाठी झालेल्या रक्कम रु.६०,३७,०७४/-च्या खर्चाची नोंद घेऊन त्यास मान्यता मिळणेबाबत या विषयावर दि.०२/११/२०२२ चे सभेतील निर्णय क्र.५५८ प्रमाणे चर्चा करणे.**

**निर्णय क्र.६३६ तहकुब.**

---

**विषय नं.३८ श्री साईनाथ रुग्णालयात माहे ऑगस्ट-२०२२ अखेर वैद्यकीय उपचार व औषधांसाठी झालेल्या रक्कम रु.९३,७७,७२०/-च्या खर्चाची नोंद घेऊन त्यास मान्यता मिळणेबाबत या विषयावर दि.०२/११/२०२२ चे सभेतील निर्णय क्र.५५८, ५५९ प्रमाणे चर्चा करणे.**

**निर्णय क्र.६३७ प्रस्ताव सादर केलेला नाही.**

---

**विषय नं.३९ माहे जून-२०२२ ते ऑगस्ट-२०२२ जमा खर्च तक्त्यास (दि.२/११/२०२२ चे सभेतील निर्णय क्र.५६९ चे अनुशंषाने) मान्यता घेणेबाबत.**

**निर्णय क्र.६३८ प्रस्ताव सादर केलेला नाही.**

---

**विषय नं.४० संस्थानचे मंजूर आकृतीबंधातील कंत्राटी पदांवर ११ महिन्यांकरीता कंत्राटी पध्दतीने नेमणूक करण्यात आलेल्या कंत्राटी कर्मचा-यांना सेवा रजा विनियम–२०१३ नुसार रजा, सुट्टया लागू केलेबाबत.**

**निर्णय क्र.६३९ तहकुब.**

---

**विषय नं.४१ संस्थान वाहनांसाठी, विद्युत जनित्रे तसेच इतर विभागांना लागणारे इंधनाची झालेली खरेदीची माहिती सादर.**

**निर्णय क्र.६४० अवलोकन केले. इंधनाचे बचतीबाबत विभागप्रमुख यांना निर्देश देण्यात यावेत. व माहिती सादर करण्यात यावी.**

---

**विषय नं.४२ संस्थानला माहे डीसेंबर-२०२१ ते जुन-२०२२ या कालावधीमध्ये प्राप्त झालेल्या शुध्द तुप व खाद्यतेलाचे विविध प्रयोगशाळेमार्फत करणेत आलेल्या तपासण्यांचे अहवालाबाबत.**

**निर्णय क्र.६४१ प्रस्ताव सादर केलेला नाही.**

---

**विषय नं.४३** **पुर्वीचे ठेक्याची मुदत माहे मार्च-२०२३ मध्ये संपुष्टात येत असल्याने, सन २०२३-२४ करीता पुर्व तयारी करणेचे दृष्टीने मोतीचुर लाडू, सुटी बुंदी व बर्फी प्रसाद तयार करुन पॅकींग करुन देणेकामी उक्त्या मजुरी दराची अंदाजे रक्कम रु.२ कोटी मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.६४२** **विषय तातडीचा नाही सबब तहकुब.**

---

**विषय नं.४४** **बॅगेज स्कॅनरचे दुरुस्ती देखभाल कामी वार्षिक CAMC कंत्राट देणेबाबत.**

**निर्णय क्र.६४३** **दि.०२.११.२०२२ रोजीचे सभेमध्ये सदर प्रस्तावास मंजूरी देण्यात आलेली आहे.**

---

**यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयावर चर्चा करण्यात आली.**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१** **सन २०२२-२३ वर्षाकरीता प्रसादालय, कॅन्टीन, मंदिर व लाडू निर्मिती विभागांसाठी आवश्यक किराणा माल खरेदीकामी तांत्रिक निविदेमध्ये पात्र ठरलेल्या निविदाधारकांचे नमुने निवडीचे कामकाजांबाबत.**

**निर्णय क्र.६४४** **पुर्वी प्रत्येक वस्तुसाठी स्वतंत्र विक्रेता निविदा भरु शकत होता. परंतु आता पहिल्यांदाच सर्व वस्तुचे एकुण सात गट तयार केले नंतर दहा गट तयार केले. या प्रक्रियेत एखादया वस्तुचा ठोक विक्रेता इतर वस्तुसाठी निविदा भरणार असल्यास तो या प्रकियेत भाग घेऊन शकत नाही आणि तो बाद होतो. त्यामुळे यामध्ये व्यावसाईक स्पर्धा होऊ शकत नाही. पुर्वी एक-एक वस्तुसाठी स्वतंत्र ई निविदा भरण्यासाठीची मुभा असतांना ती बदलुन अनेक ठरावीक वस्तुंसाठी गट बनविण्याचे काहीही तर्कसंगत कारण नमुद केलेले नाही. त्यामुळे या सर्व सामान्य त्रुटी निदर्शनास येतात तथापी तातडीची निकड लक्षात घेता निवड प्रक्रियेस समिती मान्यता देता आहे. तथापी स्पर्धात्मक बीडींग करता जे वर नमुद केलेले बाजार आहेत व जे मोठमोठे पुरवठादार आहेत ज्याच्या मध्ये एका छताखाली सर्व वस्तु संकलन होऊ शकतात अशा संस्थाकडून माहिती व दरपत्रक मागविणे आणी समितीसमोर तुलनात्मक माहितीसह व प्रशासनाचे स्पष्ट अभिप्रायासह प्रस्ताव तात्काळ सादर करण्यात यावा.**

**नमुने तपासण्याचे संदर्भात किराणा माल खरेदी करणेकामी प्राप्त ई-निविदेतील किराणा मालाचे नमुने निवडीचे कामकाज राहूरी विद्यापीठातील दोन तज्ञ संस्थानचा आचारी, खरेदी व भांडार विभागाचे प्रशासकीय अधिकारी श्री.किसवे यांचे उपस्थित करुन घेण्यात यावे.**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२** **श्री साईबाबा हॉस्पिटल परिसरामध्ये ५ वर्ष कालावधीसाठी भाडेतत्वावर औषध दुकान चालविणेस देणेबाबत.**

**निर्णय क्र.६४५** **अटी व शर्तीचे अवलोकन केले असता व माहिती घेतली असता असे लक्षात आले की, सध्या अस्तीत्वात असलेले दुकानदार रक्कम रु.१७,३१,३४०/- आहे आणि उच्चतम निविदा फक्त रु.११,२५,११२.५० आल्याचे दाखविले आहे. यांची कारणे पाहिली असता निविदेमध्ये उदा. निविदाधाराकडे १० मेडीकल स्टोअर्स असणे आणि दहा वर्षाचा अनुभव असणे या अटी शर्तीमुळे स्पर्धत भाग घेणारांची संख्या कमी झाली आणि संस्थानचे नुकसान झाले. इतर विषयांमध्ये रि-टेंडर बाबत प्रशासकीय स्तरावर निर्णय घेऊन समितीसमोर मांडले आहे. सध्या रक्कम रु.१७,३१,३४०/- एवढे मासीक भाडे असतांना फक्त रु.११,२५,११२.५० ची निविदा मान्यतेसाठी सादर करणे सर्वथा अमान्य आहे. सदरचा प्रस्तावच संस्थानचे हिताचे विरोधात आहे. असा प्रस्ताव मंजूरीसाठी पाठविणेच चुकीचे आहे. सबब प्रस्ताव अमान्य.**

**प्रत्येक खरेदी प्रक्रियेमध्ये आतापर्यंत जी चर्चा केली त्यामध्ये समितीचे अध्यक्ष व सदस्य यांनी नाराजी व्यक्त केली आहे.**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३** **श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयामध्ये भाडे तत्वावर Liquid Medical Oxygen Gas Plant (LMO) बसविणेबाबत.**

**निर्णय क्र.६४६** **प्रस्ताव अमान्य. फक्त फेर प्रस्ताव सादर करावा. परिस्थितीचा अंदाज न घेता, उपयुक्तता लक्षात न घेता, प्रस्ताव सादर केला आहे. अस्तीत्वात असलेल्या टॅंक मधुन गॅस् उपलब्ध करुन घेता येतो. परिसरातील संगमनेर इतर ठिकाणी उपलब्ध असतांना वैद्यकीय प्रशासनास त्याची आवश्यकता व विशलेषन केले तर त्यावर समिति निर्णय घेईल. कोरोना कालावधीमध्ये जिल्हातील जी परिस्थतीती होती तशी ऑक्सीजन तुटवडा परिस्थिती नाही.**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.४**

**निर्णय क्र.६४७** **संस्थानचे कारभारात पारदर्शकता आणण्यासाठी समिती सभेचे इतिवृत्त पुढील सभेमध्ये वाचून कायम होण्याची वाट न पाहता तात्काळ संस्थानचे संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात यावे.**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.५**

**निर्णय क्र.६४८** **परदेशातील तसेच भारतातील साईभक्त जे पंचवीस हजार रुपये पेक्षा जास्त रकमेची ऑनलाईन देणगी देतात त्यांना भारतात आल्यानंतर समाधी मंदिरात दर्शनाचे वेळी पंचवीस हजार रुपये पेक्षा जास्त रकमेचे देणगीदार म्हणून आरतीसाठी पास मिळविण्यासाठी त्यांना इथे गैरसोय होऊ नये म्हणून Computerization चा उपयोग करुन त्यांचे कडील देणगीची पावती पाहून कॉम्प्युटर सिस्टीम मध्ये नोंद करुन त्वरीत पास देण्यासाठी एक कॉम्प्युटर काऊंटरची व्यवस्था करुन देण्यात यावी. कॉम्प्युटरमध्ये नोंद केल्यानंतर त्याच पावतीचा पुन्हा आरती पास म्हणून उपयोग होणार नाही. अशी दक्षता Computerization नोंदीव्दारे घेता येईल.**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.६**

**निर्णय क्र.६४९** **सभेचे इतिवृत्त वाचून कायम करतांना त्यामधील घेतलेल्या निर्णयावरील केलेल्या कार्यवाहीबाबतचा अहवाल संबधीत कागदपत्रांसह विभागप्रमुख यांनी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे सादर करावा व मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सदरचा अहवाल सभेपुढे**

**सादर करावा.**

---

**वरील निर्णय क्र. ६०३ ते ६४९ सर्वानुमते घेण्यात आले.**

**यानंतर दुपारी ३.३० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.**

स्वाक्षरीत/-
**(राहूल जाधव)**
**उप मुख्य कार्यकारी अधिकारी**
**सदस्य,तदर्थ (Ad-hoc) समिती**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**

स्वाक्षरीत/-
**(डॉ.राजेंद्र भोसले,भा.प्र.से)**
**जिल्हाधिकारी अहमदनगर तथा**
**सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती.**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**

स्वाक्षरीत/-
**(सुधाकर यार्लगड्डा)**
**प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर तथा**
**अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती.**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**